सिडको/कार्मिक/भरती/2024/ दि. 08.01.2024

**शुध्दिपत्रक क्र.2**

**विषय:- दि.09.12.2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या लेखा लिपिक या संवर्गातील रिक्त पदांच्या जाहिरातीबाबत व अर्ज भरण्याच्या कालावधीत मुदतवाढ करण्याबाबत**

सदर शुध्दिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दि.09.12.2023 रोजी प्रसिध्द केलेल्या लेखा लिपिक या संवर्गातील रिक्त पदांच्या जाहिरातीमध्ये अनुक्रमांक 1 मध्ये दिलेल्या पदांच्या तपशीलामध्ये वि.जा.(अ), भ.ज.(ब) व आदुघ या प्रवर्गातील रिक्त पदे फक्त महिलासांठी आरक्षित असल्याकारणाने ऑनलाईन अर्ज सादर करताना फक्त महिला उमेदवारच सदर पदांकरीता अर्ज करु शकत होत्या. त्यामुळे, सदर प्रवर्गातील पुरुष उमेदवारांना त्यांच्या मुळ प्रवर्गातुन अर्ज करण्याची तरतुद करण्यात आली नव्हती व सदर उमेदवार केवळ अराखीव पदावर अर्ज करु शकत होते.

मात्र, सदर बाबत ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या लिंक मध्ये आवश्यक तो बदल करण्यात आला असुन वि.जा.(अ), भ.ज. (ब) व आदुघ या प्रवर्गातील पुरुष उमेदवारही आता त्यांच्या मुळ प्रवर्गातुन अर्ज करु शकतात व सदर प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या रिक्त पदांकरीता महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर शासन निर्णय क्रमांक क्रमांक 82/2001/मसंआ/-2000/प्र.क्र.415/का-2,दि.25.05.2001 अन्वये संबंधित प्रवर्गातील पुरुष उमेदवारांचा विचार करण्यात येईल आणि यापुर्वी अर्ज सादर केलेल्या वि.जा. (अ), भ.ज. (ब) व आदुघ या प्रवर्गातील पुरूष उमेदवारांनी अराखीव पदावरील निवडीकरीता अर्ज सादर केला असला तरीही अशा पुरुष उमेदवारांचादेखील संबंधित प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास विचार करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

तसेच, दि.09.12.2023 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये अर्ज सादर करण्याचा कालावधी दि. 09.12.2023 पासुन दि. 08.01.2024 पर्यंत होता, सदर कालावधीमध्ये मुदतवाढ करुन अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.23.01.2024 करण्यात आला आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

**महाव्यवस्थापक (कार्मिक)**